बातम्या व
जाहिरातीसाठी
* संपर्क *
मोबा.9403117883
9309542866

साप्ताहिक
# ग्राम चैतन्य

Title Code MAHMAR50522

संपादक : विक्रम देवरे

गुरुवार दि. 7 ऑक्टो. 2021 | वर्ष 1 ले. | अंक 9 | पाने.4 | किं. 2 रु.

# दोन्ही बाजूने संवाद हाच राष्ट्रवादीचा परिवार संवाद

# ना.जयवंतराव पाटील यांचे चांदवडला कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

## चांदवड- देवळा तालुक्याच्या पाणीप्रश्नी लवकरच मुंबईला विशेष बैठक घेणार




चांदवड- चांदवड येथे राष्ट्रवादी परिवार संवाद यात्रेप्रसंगी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा जलसंधारण मंत्री जयवंतराव पाटील यांनी सांगीतले की, पक्षाची बुथ सांभाळ करणारी यंत्रणा एकच पाहिजे. अभिप्राय नोंदणी मध्ये नाशिक जिल्ह्यातून 59263 अभिप्राय आले आहेत. त्यातही युवक राष्ट्रवादी काँग्रेसने उत्साहाने अभिप्राय दिले . तालुक्यातील उत्तमबाबा भालेराव व डॉ.सयाजीराव गायकवाड हे एकत्रितपणेचांगले काम करतात. कार्यकर्त्यांनी व्यवस्थितपणे काम केले तर 2024 मध्ये आम्ही हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्याचा प्रयत्न करु जिल्हाध्यक्ष रविंद्रनाना पगार यांच्या माध्यमातून प्रमुख लोक एकत्र येऊन एक दिवस विशेष चांदवड व देवळा तालुक्यातील पाण्याच्या समस्येवर काय करता येऊ शकते, यासाठी मुंबईला अधिकाऱ्यां समवेत मिटींग घेऊन मदत करु असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. आपला पक्ष मोठा झाला तर आपण मोठे होतो. पैसा मोठा नाही, राजकारणात वेळेची गुंतवणूक करायची असते. पक्षाच्या स्थापनेपासून जे आपल्या पक्षात आहे,त्यांनी आपले आयुष्य आपल्या पक्षात गुंतवलेले आहे. पक्षाचे भवितव्य उज्ज्वल करण्याशिवाय पर्याय नाही. भविष्यकाळात पक्ष मोठा झाला पाहिजे, जे काम आपण करताहेत ते वेगाने केले पाहिजे. हा राष्ट्रवादी परिवार संवाद आहे. दोन्ही बाजूने संवाद व्हावा लागतो. मी यायचे भाषण करायचे निघून जायचे. असे न करता तुमचे काय आहे ते ऐकूण घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. या जिल्ह्यात कार्यकर्त्यांचे फार मोठे मोहळ आहे. कार्यकर्त्यांचे शरद पवार साहेब व राष्ट्रवादीवर प्रचंड प्रेम आहे. तुम्हीही माझ्यासाठी थांबला नसून शरद पवारांसाठी थांबले आहात. महाराष्ट्रात सर्वात स्ट्रॉंग व उत्तुंग नेता आपल्या पक्षाकडे आहे. आपला शत्रु कोण आहे हे निश्चित केले पाहिजे.काँग्रेसची साथ घेतली पाहिजे. जोरदार बॅटिंग केली तर हा मतदारसंघ आपण मिळवू शकतो. असेही ना.जयंवतराव पाटील यांनी सांगीतले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी यावेळी सांगीतले की, परिवार संवाद यात्रेच्या माध्यमातून पांढऱ्या कागदावर शाहिने लिहिलेली कार्यकारणी खरच अस्तित्वात आहे का याची पडताळणी आम्ही करत असतो. विरोधकांशी संघर्ष करुन कार्यकर्ते पक्षाचे कार्य तळागाळापर्यंत पोहचवतात. सत्तेच्या बाहेर गेल्यावर संघटनेचे महत्व कळते. सत्ता गेली तेव्हा साहेबांना साथ देण्यासाठी संघटना व कार्यकर्ते उरली. अशा कार्यकर्त्यांना सत्तेच्या काळात मानसन्मान मिळावा म्हणून परिवार संवाद यात्रेतून लक्ष दिले जात आहे. राष्ट्रवादीमय महाराष्ट्र ही संकल्पना या परिवार संवाद यात्रेची आहे. तत्पूर्वी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी चांदवड व देवळा तालुक्यातील तालुका राष्ट्रवादी काँग्रेस,युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, ओ.बि.सी.सेल, साहित्य व सांस्कृतिक विभाग, सोशल मीडिया विभाग, डॉक्टर सेल, राष्ट्रवादी किसान सभा, सार्वजनिक ग्रंथालय सेल, राष्ट्रवादी किसान सभा, अल्पसंख्याक सेल, युवती काँग्रेस, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस ,सामाजिक न्याय विभाग,कायदा सेल, सेवादल यासारख्या विविध फ्रंटल विभागाचा आढावा घेतला. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी सांगीतले की, गडचिरोली पासून सुरु झालेली परिवार संवाद यात्रा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पार पडली आहे.अनेक ठिकाणीजाऊन आढावा घेतला आहे. काम करणारा कार्यकर्ता नेता होत असतो, फोटो व बॅनरवर फोटो लावून नेता होत नाही. यावेळी चांदवड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष डॉ.सयाजीराव गायकवाड यांनी चांदवड तालुक्यातील पक्षाच्या बुथ कमिट्या, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, कादवा कारखान्यात चार संचालक राष्ट्रवादीचे असून मराठा विदयाप्रसारक समाज संस्थेचे संचालक राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. हा विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सोडावा, अशी मागणीही त्यांनी केली. देवळ्याचे तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे यशवंत शिरसाठ, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील आहेर, देवळा शहराध्यक्ष दिलीप आहेर, योगेश आबा आहेर यांनी माहिती दिली. चांदवड तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय वाघचौरे यांनी यावेळी संघटनेबाबत माहिती देताना सांगीतले की,40 अंगणवाडी सेविकांना कोरोना काळात युवक काँग्रेसने मोफत वाफेचे यंत्र वाटप केले. विविध आंदोलने केली, युवा संवाद दौऱ्यानिमित्ताने चांदवडला संवाद दौरा आयोजित केला होता. तालुक्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाशी युती न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी, तसेच तालुक्यातील विविध सरपंचाची मुलभूत सुविधा व इतर कामे मार्गी लागली पाहिजे अशी मागणी दत्तात्रय वाघचौरे यांनी केली. सूत्रसंचालन

पान 2 वर..

# रायपुरच्या भुमित सौरभ हेअर स्टुडीओ हे अत्याधुनिक दालन

## घटस्थापनेच्या मुहूर्तावर शिरिषकुमार कोतवाल यांच्या हस्ते उद्घाटन

## नोकरीच्या मागे न लागता सौरभ सोनवणे या तरुणाने निवडली वेगळी वाट

चांदवड - घटस्थापनेच्या मुहूर्तावर चांदवड तालुक्यातील रायपूर येथे सौरभ हेअर स्टुडीओ या अत्याधुनिक केस कर्तनालयाचे उद्घाटन सकाळी 10 वाजता गुरुवार दिनांक 7 ऑक्टोबंर 2021 रोजी चांदवड - देवळा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार श्री.शिरीषकुमारजी कोतवाल यांच्याहस्ते संपन्न होत आहे. रायपूर सारख्या ग्रामीण भागात पण वेगाने विकसित होत असलेल्या, शहरालाही उद्योग धंद्यात लाजवेल अशा या नवग्राम शहरिकरणाकडे वाटचाल करणाऱ्या प्रभू श्रीरामांचा वारसा सांगणाऱ्या व मनमाड- लासलगाव या दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाच्या रायपूर नगरीच्या शिरपेचात सौरभ हेअर स्टुडिओ नावाचे भव्य अत्याधुनिक दालन नवरात्रोत्सवाच्या प्रारंभीच दाखल होत आहे. नवीन सर्व सुविधायुक्त सौरभ हेअर स्टुडिओ हा युवकांचे आकर्षण ठरणार आहे.

या अत्याधुनिक केस कर्तनालयात सर्व प्रकारच्या कटींग, दाढी, वेगवेगळ्या प्रकारचे टॅटू, केसांना वेगवेगळ्या प्रकारचे कलर करणे, फैशनेबल कटींग, नवरदेव नवरीचे मेकअप, तसेच लग्न समारंभ व वेगवेगळ्या समारंभात फेटे बांधणे, लेडिज हेअरकट, मेकअप, केसांचे सौंदर्य वाढविण्यासाठी सर्व प्रकारच्या केमिकल ट्रिटमेंट, हेअरकट, हेअरकलर, हेअर स्पा, हेअरस्टाईल, बॉडीमसाज या



सुविधा नवीन अद्ययावत केसकत्रनालयामध्ये वाजवी दरात उपलब्ध राहणार आहे.

विशेष म्हणजे या केसकत्रनालयाचे संकल्पना व संचालक करणारा रायपूर येथील युवक सौरभ अनिल सोनवणे यांचे शिक्षण ग्रॅज्युएशन पर्यंत झालेले असले तरी इतराप्रमाणे नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सौरभने लेडीज व जेन्टस् प्रोफेशनल क्लास केलेला आहे. या नवीन व्यवसायाच्या संकल्पनेबद्दल सौरभला विचारले असता त्यांनी सांगीतले की, आजच्या आधुनिक काळात ग्रामीण भागात अशी सुविधा देण्याचा मानस होता. नोकरीच्या मागे न लागता कलागुणांना वाव मिळावा याचा हा प्रयत्न आहे. शहरी सुविधा ग्रामीण भागात अल्पदरात देण्याचा प्रयत्न आहे. आमच्या 7 पिढ्यांमध्ये हा कोणीही पिढीजात व्यवसाय केलेला नाही. आमचा शेती हा व्यवसाय आहे व त्याला जोडधंदा म्हणून उचलले हे एक पाऊल आहे. मला माझ्या मनात आमच्या पिढीजात न्हावी धंद्याकडे ओढा निर्माण झाला. प्रसन्न ॲकेडमी नाशिक येथे प्रशिक्षण घेतले. नाशिक येथील नितीन वाघ, गणेश कार्ले व दिपाली पगारे यांचे योग्य मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील तरुणांचा चेहरा-मोहरा बदलवणे हे माझं या व्यवसायाच्या माध्यमातून प्रयत्न आहेत. माझे वडील अनिल सोनवणे व चुलते श्री विलास सोनवणे (माध्यमिक शिक्षक ) यांचे मोलाचे सहकार्य याकामी लाभले व त्यांनी काम करण्यास प्रोत्साहन दिल्याने मी या नवीन व्यवसायात पाऊल ठेवत आहे. असे सौरभने सांगीतले.




Owner & Editor :- Vikram Karbhari Deore Printed by : New Sharp Offset Printers, Malegaon Dist. Nashik Published By Vikram Karbhari Deore On behaf of (OR OWNED BY) Vikram Karbhari Deore And Printed At. :- New Sharp Offset Printers , Md. Ali Road, Malegoan, Apsara & Madeena Darbar, Malegaon Dist. Nashik Malegaon (Name of the Printing Press with Address) And Published At. Po.Daregaon, Tal.Chandwad,Dist. Nashik Pin 423 104 (Full Address of the Palce of Periodical) Mob. 9403117883 / 9309542866